# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १२८** **दिनांक- १५/०५/२०२१**

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०१ पिडीत मुलीची सुटका केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.एस.एस.पाटील, यांनीमिरा-भाईन्दर परिसरातील ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हिसेसच्या माध्यमातुन चालणाऱ्या वेश्याव्यवसायाच्या अनुषंगाने गोपनीय माहिती मिळविली असता, गुप्त बातमीदाराकडून अशी बातमी मिळाली की, **Full sex service Mira Road (Mumbai)-Persanals ads... More results from m.in.Locan.to https://chatwith.io/s/6076a36722ed3** या वेबसाईटवरून तसेच मोबाईल क्र.९६५३६५०११९ च्या माध्यमातुन हर्ष गुप्ता रा. अंधेरी पूर्व व त्याचा साथीदार संतोष पासवान रा. बोरीवली हे मुलींना वेश्याव्यवसायाकरीता प्रवृत्त करुन पुरुष ग्राहकाकडून पैशाचा मोबदला घेवून वेश्यागमनाकरीता मुली पुरवित आहेत.

दि.१३/०५/२०२१ रोजी हर्ष गुप्ता व त्याचा साथीदार संतोष पासवान यांचे सांगणेवरुन बबलु राजेंद्रप्रसाद गुप्ता रा. काशिमीरा हा मुंबई अहमदाबाद हायवे रोडवरील सपना लॉजसमोर, काशिमीरा या ठिकाणी पुरुष ग्राहकास मुली पुरविणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.एस.एस.पाटील, यांनी ऑर्बीट हॉस्पीटलचे जवळ, सपना लॉज काशिमीरा या ठिकाणी पोलीस पथकासह १८.२० वा. छापा टाकला असता वेश्या दलाल बबलु राजेंद्रप्रसाद गुप्ता वय २७ वर्ष रा. जयनगर चाळ, माशाचा पाडा रोड, ग्रीन व्हिलेज, काशिमीरा, ता.जिल्हा ठाणे मुळगाव गाव बागुमंडी, ता.जिल्हा हिटखोरी, राज्य झारखंड हा त्याचे ॲटो रिक्षा क्र. MH-03-BY-6168 मधुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष ग्राहाकांना मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाले. वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह त्यास ताब्यात घेवुन ०१ पिडीत महिलेची सुटका करण्यात आली.

सदर बाबत पो.हवा./२२६९ उमेश पाटील यांचे फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ३८५/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०(१),३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे)मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध

Scanned with CamScanner